Vol 1 Issue 6 Dec 2011 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.VI/Dec 2011pp.1-4

Research Paper

# स्त्री भ्रूणहत्येचा समाजावर होणारा परिणाम

*एम.एम.जगताप*
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख , बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.पा.विज्ञान महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ.

*सारांश :*

"स्त्री लिंग भ्रूणहत्या महापाप !
मानव समाज बिघडविण्याचा अभिशाप!!"

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रगत महिला ही पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून प्रगतीचे दरवाजे खुले करीत आहे. परिवर्तनवादी विचारसरणीचा आढावा घेऊन जीवनातील सातत्य व प्रगतीशील जीवनाच्या उपाययोजना यांना आत्मसात करून प्रगतीचे एक–एक पाऊल पूढे टाकीत आहोत तरी सुध्दा हुंडाबळी, देवदासी, वेश्या व्यवसाय, बलात्कार, कुमारी माता, अपहरण, खुन, घटस्फोट स्त्री अत्याचार अशा विविध समस्या स्त्रियांपुढे आ वासून उभ्या आहेत देशात बालीका भ्रूणहत्येचे प्रमाण लक्षणीय वाढले असून यात सर्वाधिक प्रसवपूर्व गर्भलिंग निदानाच्या वेळी अर्थात जन्माला यायच्या आधीच तीला मारले जाते.

***प्रस्तावना***

विज्ञानयुग परिवर्तनशील युग आहे. परंतु या वैज्ञानिक शोधाचा दुरूपयोग झाला तर तो अभिषाप ठरतो. यातील एक अमानवीय क्रूरकृत्य म्हणजे जन्माआधीच गर्भात स्त्री लिंगाची हत्या करणे होय. विज्ञानामुळे वैदयकीय क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा परिणाम गर्भजल चिकित्सा सुलभ झाली. त्याचा दुरूपयोग स्त्री भ्रूणहत्येसाठी होवू लागला. देशात 1994 व महाराष्ट्रात 2003 मध्ये लिंगभेद चाचणी वर बंदी झुागारून गर्भजल परिक्षेद्वारे मुलीचा गर्भ नष्ट करण्याचे प्रकार सर्रास चालु आहे. ही समस्या आता गंभीर होत चालली आहे. स्त्री जीवनातील विवाह, अपत्य प्राप्ती, वैधव्य, पुर्नविवाह, मालमत्तेवरील हक्क यासर्वांमध्ये धर्म, निती अनिती मानवी अधिकार, लिंग साक्षेप गर्भपात असे संकल्पनाचे लेप गर्भपाताशी जोडुन सामान्याचे तत्वज्ञान डावलले जात आहे. गर्भपात करून घेणे ही स्त्रीची शारिरीक, मानसिक, वैदयकीय किंवा आर्थिक गरज असू शकते. नको असणारा गर्भ ठेवायचा किंवा नाही हा अधिकार स्त्रीलाच असायला पाहीजे. या भूमिकेतून गर्भपात करावयाचा विचार पूढे आला. भारतातील गर्भपात कायदयात

सुधारणा करणे अत्यंत गरजेचे असले तरी स्त्रीलींग गर्भपात स्त्रियांना हतबल करणारा ठरेल म्हणून कायदेशिर गर्भपाताची वैदयकीय कारणांसाठी गर्भपातांची आवश्यकता भासते त्यामुळे गर्भपाताला विरोध करतांना आपण स्त्रीयांच्या हक्कांना तिलांजली देणार का ? प्रश्न उपस्थित राहतो.

1901 च्या जणगणनेपासून लिंग गुणोत्तरामध्ये सतत बदल होत आहे. 1978 मध्ये स्त्री भ्रूणहत्येला चालना मिळाली हुंडा पध्दतीमुळे मुलगी ही कुटूंबावर भार असते. या समजुतीमुळे भारतामध्ये मुलगा वंशाचा दिवा आणि मुलगाच हवा व पुरूषप्रधान संस्कृति याचा पगडा समाजावर दिसून येतो. 1981 च्या जणगणनेनंतर प्रथमच देशात लिंग गुणोत्तरविषयीच्या गंभीर चर्चेस प्रारंभ झाला. मातामृत्यूचे वाढते प्रमाण, स्त्री अर्भक हत्या व जणगणनेतील पुरूषी पूर्वग्रह यांना लोक संख्येतील स्त्रीयांच्या घटत्या प्रमाणासाठी जबाबदार धरण्यात आले. 2001 मध्ये लिंग गुणोत्तरातील घट पूढील कारणामुळे झाली असल्याचे दिसून येते.

1)वृध्दापकाळातील आधाराकरीता मूलाची गरज
2)प्रसूतीपूर्व गर्भलिंग चाचणीचा अनियंत्रीत वापर
3)शासकीय कायदेविषयक धोरण

समाजामध्ये स्त्रीयांची घटती संख्याही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्त्री जन्माचे प्रमाण झपाटयाने कमी होत आहे. मूलगाच हवा हा अट्टाहास मुलींना दुय्यम वागणुक, महिलांमध्ये असणारी आर्थिक सामाजिक शारिरीक असुरक्षितता, हुंडा पध्दती, गर्भलिंग निदानाची सहज व परवडण्याजोगी उपलब्धता इत्यादी कारणांमुळे समाजात स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण वाढलेले आहे. त्यासाठी समाजजागृती व्हावी व मूलींना प्रतिष्ठा मिळावी याकरीता समाजाने सतत प्रयत्नशील असावे.

***उद्दिष्टये :–***

1)स्त्री भ्रूणहत्येचा समाजावर होणारा परिणाम
2)स्त्री भ्रूणहत्या थांबवण्यासाठी उपाय सांगणे
3)स्त्री भ्रूणहत्या करण्यामागील कारणांचा शोध घेणे
4)स्त्री भ्रूणहत्येचे स्वरूप स्पष्ट करणे
5)गर्भलिंग तपासणी व फायदे या विषयीचा अभ्यास करणे

स्त्री भ्रूणहत्या ही एक गंभीर सामाजिक समस्या असून संपूर्ण भारतभर पसरलेली आहे. याचा महत्वपूर्ण परिणाम म्हणजे लिंग अनुपातामधील असंतुलन होय. 2011 च्या जणगणनेनुसार देशात हजार पुरूषामागे महिलांचे प्रमाण 940 झाले आहे. तसेच महाराष्ट्रात 893, गुजरात 918 व बिहारमध्ये 916 इतके आहे. व अन्य राज्यातही अशाच प्रकारची परिस्थिती दिसून येते. 6 वर्षाखालील मूलींचे प्रमाण 30 अंकानी कमी झालेले दिसते.

***स्त्री भ्रूणहत्येची कारणे :–***

1)लिंग तपासणी करून केलेली भ्रूणहत्या
2)सोनोग्राफिच्या क्लिनीकचा वाढता सुळसुळाट
3)या बाबतीत असणारा स्त्रियांचा अशिक्षीतपणा तसेच अज्ञान
4)आजही समाजातील मूलीविषयी तिरस्कार व सामाजिक रूढी, परंपरा
5)स्त्री ला जसे तीच्या अस्तित्वाला असणारे दुय्यम स्थान

6)आजच्या या शतकात सुध्दा मुलगा म्हणजे वंश चालविणारा दिवा ही समाजाची मानसिकता
7)रूढी परंपरेनुसार चालणारी पितृसत्ताक कुटूंब पध्दती
8)स्त्रियांच्या क्षमतेवर असणारी समाजाची पूर्वग्रहदुशित धारणा
9)खेडेगावातून स्त्री भ्रृणहत्याविषयी असणारे गैरसमज व अज्ञान

1951 ते 2013 या वर्षात स्त्री–पुरूष प्रमाण लक्षात घेतल्या नंतर 60 वर्षात दरहजारी पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण वाढण्याऐवजी कमी–कमी होत असल्याचे दिसून येते. भारतात स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे प्रमुख कारण म्हणजे लिंग असमानता होय. लिंग असमानतेमुळे पूरूषांपेक्षा स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. त्यांना क्षूद्र मानल्या जाते.

### *स्त्री भ्रृणहत्येमुळे होणारे सामाजिक दुश्परिणाम :–*

1)स्त्रीयांच्या संख्येमध्ये घट होईल
2)विवाह संस्था धोक्यात येवू शकते
3)महिलांवरील अत्याचारामध्ये वाढ होईल
4)विवाह करण्यास जोडीदार मिळणार नाही
5)स्त्रीयांच्या लैंगीक शोषणामध्ये वाढ होईल
6)समाजातील नैतिकतेला तडा जाईल
7)बहुपती विवाहाची प्रथा सुरू होईल
8)कुटूंब संस्था लोप पावेल
9)लोकसंख्येत घट निर्माण होईल

### *स्त्री भ्रृणहत्या रोखण्याकरीता उपाय योजना :–*

1)समाज जागृती करून महिलांना समान संधी देणे
2)गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदयाची कडक अंमलबजावणी होण आवश्यक आहे
3)हुंडाबंदी कायदा प्रभावीपणे अमलात आणून हुंडा घेणाऱ्यावर व देणाऱ्यावर कडक कार्यवाही करणे
4)समाजाची मानसिकता बदलविणे
5)लग्नापूर्वी मूलगी ही आर्थिक दृष्टया स्वतंत्र असावी
6)सकारात्मक संदेश समाजाला देणे
7)भविष्यात स्त्री भ्रृणहत्या होणार नाही, याबाबत युवा पिढीचे मनोबल वाढविणे
8)बालीका दिन साजरा करणे
9)लेक लाडकी अभियान राबविणे
10)सामाजिक धार्मिक संस्थाचा पुढाकार
11)स्त्री शिक्षण व स्त्री व्यक्तीमत्व विकासाला प्रोत्साहन मिळेल असे उपक्रम राबविणे
12)समाजात स्त्रियांचा दर्जा उंचावल्यास स्त्री भ्रृणहत्येला आळा बसेल
13)महिलांबद्दल असलेल्या गैरसमजुती व अंधश्रध्देबाबत जनजागृती करणे
14)दोन मुली असलेल्या दाम्पत्याला योग्य मार्गदर्शन करणे
15)“मूलापेक्षा मूलगी बरी, प्रकाश देते दोन्ही घरी” असा संकल्प करून प्रत्येकाने तो आचरणात आणायला पाहीजे

### *निष्कर्ष :–*

स्त्री भ्रृणहत्या ही एक देशातील गंभीर व ज्वलंत समस्या आहे. या करीता समाजातील प्रत्येक घटकाने सहभाग घेऊन स्त्री भ्रृणहत्या रोखण्याकरीता प्रयत्न करावेत तसेच शैक्षणिक सामाजिक व नैतिक पातळीवर प्रयत्न करून उपाययोजना कराव्यात समाजातील अशिक्षीत व अज्ञानी स्त्री–पुरूषांनी याबाबत योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे तसेच मूलीचा जन्म नाकारण्याच्या मानसिकतेमध्ये बदल घडवून आणणे महत्वाचे आहे. मूलगा हा वंशाचा दिवा व मूलगी हे परक्याचे धन आहे. तो आपला वंश चालविणार ही धारणा बदलून नवीन पिढीला सतर्ककरावे व स्त्री जन्माचे आनंदाने स्वागत करावे तरच आपल्या देशातील स्त्री भ्रृणहत्या थांबतील.

### *संदर्भसूची :–*

1)देशोन्नती दिवाळी विशेषांक (2010 भाग–1)
2)भारतातील जणगणना अहवाल विविध वर्षे 1901–2001
3)काकरीया डॉ.सौ.सुधा–स्त्री जन्माचे स्वागत करा
4)आगलावे प्रदिप – भारतीय समाज संरचना आणि समस्या
5)स्त्री–भ्रृणहत्या : गांधी नॅशनल मेमोरिअर सोसायटी

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org